## मनात जाचलं !

करू करू म्हणत, पुष्कळ काही करायचं राहिलं
वेळ केव्हा निघून गेली केवळ जुनं मनात जाचलं !
'जर तर'च्या गुंत्यात अडकलेलं मन आठवायला लागलं
आठवेना ते आठविण्यासाठी तडफडू लागलं
करू करू म्हणत पुष्कळ काही करायचं राहिलं !

केलेल्या मागील चुकांचा पाढा वाचू लागलं
दुसऱ्यांनी तशा करू नयेत यासाठी तळमळू लागलं
करू करू म्हणत पुष्कळ काही करायचं राहिलं !
झाले गेले विसरून जा म्हणत विसरून जातो
घडलेल्या चुका पुन्हा होऊ नये यासाठी आपण काय करतो ?
पुढच्यास ठेच मागचा शहाणा ही म्हण गात बसतो
करू करू म्हणत पुष्कळ काही करायचं राहिलं !

पुढच्यास ठेच लागण्याची वाट पाहात बसू नका
माझ्या झाल्या त्या चुका तुम्ही करू नका
वेळ निघून गेली की मग मनात जाचेल
करू करू म्हणत पुष्कळ काही करायचं साचेल
वेळेवर गोष्टी केल्या तर तुमचाच वेळ वाचेल !

■

– पद्माकर चित्रे

('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)